# ज्योतिर्मय

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १०७ वा ❑ भारतीय सौर दिनांक १६ ज्येष्ठ शके १९४८, शनिवार दि.०६ जून २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## चोरीच्या घटनांमध्ये वाढ: सुरक्षिततेचा प्रश्न

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

समाजात चोऱ्या आणि फसवणुकीच्या वाढत्या प्रमाणांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची आणि भीतीची भावना निर्माण झाली आहे. गुन्हेगारीच्या या वाढत्या धोक्यामुळे वैयक्तिक मालमत्तेचे नुकसान तर होतेच, शिवाय मानसिक शांतताही भंग पावते.

वाढत्या महागाईमुळे आणि रोजगाराच्या अपुऱ्या संधींमुळे अनेकांना अनैतिक मार्गांचा अवलंब करावा लागतो.डिजिटल फसवणूक तंत्रज्ञानाचा वापर करून बँक खात्यांमधून पैसे काढणे, ओळख चोरी आणि ऑनलाइन फसवणुकीच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे.अमली पदार्थांच्या आहारी गेलेले अनेक व्यक्ती व्यसनासाठी चोऱ्या करतात.

स्थानिक भागात चोरीच्या घटनांमध्ये होणारी वाढ आणि त्यामुळे निर्माण झालेला सुरक्षिततेचा प्रश्न ही अत्यंत गंभीर बाब आहे. या समस्येमुळे नागरिकांच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून स्वतःच्या घरात आणि परिसरातही असुरक्षित वाटू लागले आहे गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी आणि सुरक्षिततेच्या उपायांची कडक अंमलबजावणी करण्याची वेळ आली आहे.

चोरी आणि गुन्हेगारीच्या वाढत्या घटना ही अत्यंत गंभीर चिंता आहे. बेरोजगारी, व्यसनाधीनता आणि कडक कायद्यांचा अभाव यामुळे गुन्हेगारांचे फावत आहे. या समस्येचे गांभीर्य ओळखून स्वतःच्या आणि परिसराच्या सुरक्षिततेसाठी सतर्क राहणे गरजेचे आहे.

वर्धा शहरात जबर चोरी

वर्धा शहरात दुचाकी चोरी, मोबाईल चोरी आणि घरफोडीच्या (विशेषतः सराफा दुकानांची) घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. नुकत्याच घडलेल्या काही प्रमुख घटनांमध्ये

रामनगर पोलीस स्टेशन हद्दीतील जुनी म्हाडा कॉलनी येथील शॉपिंग कॉम्प्लेक्समध्ये एकाच रात्री चोरट्यांनी दुकाने फोडून ऐवज लंपास केला.

भवानी ज्वेलर्सवर दरोडा टाकून ८ किलो चांदी आणि सोन्याचे दागिने चोरणाऱ्या आंतरराज्यीय टोळीला (एका अल्पवयीन मुलासह) स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे.

सेवाग्राम हद्दीतील टेलिकॉम नगर येथे चोरट्यांनी एकाच दिवशी दोन घरी चोरी करून दागिन्यांसह नगदी मुद्देमाल लंपास केला.

वर्धा शहर आणि जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांमध्ये दुचाकी व मोबाईल चोरीच्या घटना वाढल्या असून, गर्दीच्या ठिकाणी महिलांच्या पर्समधून दागिने व रोख रक्कम लंपास करणाऱ्या टोळ्या सक्रिय आहेत.

वाढत्या गुन्ह्यांमुळे वर्धा पोलिसांनी स्थानिक गुन्हे शाखा आणि सायबर सेलच्या मदतीने गस्त वाढवली आहे.संशयितांवर पाळत ठेवण्यासाठी सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे.सराईत गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यासाठी विविध पथके तयार करण्यात आली आहेत.

चोरीचा माल विकत घेणारी टोळी सक्रिय असल्याने चोरट्यांची टोळीच कार्यरत आहे. पोलिस चोरट्याला पकडतात. त्याच्यावर आरोपी म्हणून खटला भरतात. परंतु, त्याने ज्याला वस्तू अथवा सोने विकले आहे, त्या खरेदीदारालाही संबंधित गुन्ह्यात आरोपी केले पाहिजे. तशी कायद्यामध्ये तरतूददेखील आहे. चोरट्याला अटक केल्यानंतर त्याच्याकडील वस्तू विकत घेणाऱ्याला साक्षीदार न करता दोघांवरही गुन्हे दाखल करून कायद्यातील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्याची गरज आहे.

चोरीच्या घटना रोखण्यासाठी आणि सुरक्षितता वाढवण्यासाठी लोकांनी अधिक सतर्क राहण्याची गरज असून खालील उपाययोजना करणे गरजेचे आहे:

घराबाहेर किंवा दुकानांमध्ये उच्च दर्जाचे सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत.मौल्यवान वस्तू किंवा जास्त रोख रक्कम घरी किंवा दुकानात असुरक्षित ठिकाणी ठेवू नये.आपली दुचाकी किंवा चारचाकी सुरक्षित ठिकाणीच लॉक करून पार्क करावी.संशयित व्यक्ती किंवा हालचाली आढळल्यास त्वरित वर्धा पोलिसांशी संपर्क साधावा.

परिसरामध्ये पोलिसांची गस्त, विशेषतः रात्रीच्या वेळी, वाढवण्यासाठी स्थानिक पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा

सोसायटीच्या आवारात, किंवा घराच्या दर्शनी भागावर व आजुबाजूला प्रवेशद्वारावर आणि रस्त्यांच्या मुख्य चौकांमध्ये हाय–डेफिनिशन सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. रहिवासी संकुलांच्या प्रवेशद्वारावर २४ तास सतर्क असणारे खात्रीशीर सुरक्षा रक्षक नेमावेत शेजाऱ्यांशी चांगला संवाद ठेवा आणि अनोळखी व्यक्तींवर लक्ष ठेवा. सर्व रहिवाशांनी मिळून एक सतर्क गट तयार करावा कुलपे मजबूत असावीत, खिडक्यांना ग्रील असावे आणि रात्री झोपताना घराचे दरवाजे व्यवस्थित लॉक असल्याची खात्री करावी.

# बिहारमधील पटवाटोली आयआयटीवाले गाव

ज्योतिर्मय साहित्य

यावर्षी या गावातली ४५ मुलं पास झाली आणि त्यापैकी ३८ मुलं जेईई ॲडव्हान्सड पास झाली म्हणजे एकाच गावातल्या ३८ मुलांना ला प्रवेश मिळाला. पटवा म्हणजे पारंपारिक विणकरांच्या या गावात एकही कोचिंग क्लास नाही. इथे आहे सामाजिक समुदाय शिक्षण पध्दती जी गावातलेच आजी–माजी विद्यार्थी चालवतात..

पटवा म्हणजे जुलाहे किंवा विणकर, मूळचे राजस्थानचे; त्यांना अकबराच्या दरबारातला राजा मानसिंग बिहारमध्ये घेऊन आला. पिंडदानासाठी लागणाऱ्या एका विशिष्ट वस्त्राची निर्मिती करण्यासाठी त्यांना स्थलांतरीत करण्यात आले. नंतरच्या काळात या विणकरांचे काम इतके



जोरात सुरु झाले, की त्याला बिहारचे मँचेस्टर अशी ओळख मिळाली पण आता ही ओळख जाऊन हे आयआयटीवाले गाव असे नवे टायटल मिळाले.

शैक्षणिक परिवर्तनाची ही ज्योत १९९१ साली पेटली. त्यावर्षी जितेंद्र पटवा नावाचा तरुण आयआयटीत प्रवेश मिळवणारा गावातील पहिला विद्यार्थी ठरला. त्याच्या यशाने प्रेरणेचं बी पेरलं. आज तो परदेशात राहतो पण आपल्या गावाला विसरलेला नाही. आपल्या *''वृक्ष संस्था''* स्वयंसेवी संस्थेद्वारे तो आणि इतर आयआयटी माजी विद्यार्थी ''वृक्ष संस्था''ला आधार देतात.

हे शैक्षणिक मॉडेल अद्वितीय आहे. आधीच्या बॅचचे विद्यार्थी पुढच्या बॅचचे मार्गदर्शक बनतात. जर एखाद्या ज्युनिअरला अडचण आली, तर तो आपल्या सिनियरची मदत घेतो. अशा प्रकारे हे अखंड जाळं तयार झालं आहे जिथे प्रत्येकजण दुसऱ्याला उचलून पुढे नेतो.

या संस्थेची डिजिटल क्लासरुम आणि सुसज्ज लायब्ररी आहे. दिल्ली, मुंबईसारख्या शहरांतील तज्ज्ञ शिक्षक ऑनलाइन वर्ग घेतात. विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर लक्ष ठेवणारी एक समर्पित टीम सतत कार्यरत असते, जेणेकरून कोणीही मागे राहू नये. हा आहे आधुनिक तंत्रज्ञान आणि सामाजिक समुदायाचा संगम.

ही एक चळवळ आहे जी आयुष्यं बदलते.अनेक मुलांना मोठ्या शहरात कोचिंग घेणं स्वप्नवत होतं; आता ते स्वप्न घरबसल्या साकारतंय. विशेष म्हणजे, मुलींसाठीही या दाराचं कुलूप उघडलं आहे त्याही आता स्वतःच्या उज्ज्वल भवितव्याचे स्वप्न बघत आहेत.

पटवाटोली आपल्याला एक मोठा धडा शिकवते जेव्हा एखादा समाज एकत्र येऊन आपली गुंतवणूक मुलांमध्ये करण्याचं ठरवतो, तेव्हा चमत्कार घडतात.! सारा समाज एकत्र येणे ही खरी गरज आहे. शाळा सुधारतील तर गाव पुढे जाईल. आणि आपल्या मराठी शाळा बंद पडताहेत!!!

# गोळवलकर गुरुजी : एक महान पर्व

सुनील देशपांडे

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक परमपूजनीय माधव सदाशिव गोळवलकर तथा श्री गुरूजी यांची पुण्यतिथी त्यांना विनम्र अभिवादन!


तशा अर्थाने महापुरूष असूनही राजकीय वा समाज सुधारक असे बिरूद नसल्यामुळे सामान्य भारतीयांना ते पुरेसे परिचित नाहीत. काहींना चुकीचे परिचित वा विचित्र चष्म्यातून परिचित आहेत.म्हणून, आज श्री गुरूजी या व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून घेऊया.

मला काही समजायच्या वयापूर्वीच श्री गुरूजींचे निधन झाले. त्यामुळे एकदा आमच्या शाखेला भेट दिली, एकदा संघ शिक्षा वर्गात त्यांच्या व्यवस्थेत होतो व एका प्रकट बौद्धिक वर्गाला उपस्थित होतो एवढेच मला श्री गुरूजींचे प्रत्यक्ष दर्शन झाले. पण त्यांनी मार्गदर्शन केलेल्या संघटनेतून प्रवास केल्यामुळे आज श्री गुरूजी हे व्यक्तिमत्त्व समजून घेण्याचा प्रयत्न मी करणार आहे.

श्री गुरूजींचे व्यक्तिमत्त्व समजून घेणे सर्वात अवघड आहे. कारण, एका वेगळ्या स्तरावरील संपूर्ण विरोधाभासाने भरलेले वैयक्तिक जीवन, ते अतिशय सहजपणे जगले. मोक्षाच्या वाटेवरून चाललेला आणि शरीरापासून मुक्त असा हाआध्यात्मिक साधक भौतिक जगाच्या गराड्यात निवांत वावरत होता. ते साधना करीत आहेत म्हणून लोकांना ताटकळत ठेवलेले त्यांना कधीही कोणी पाहिलेलं नाही, पारलौकिक जगाबद्दल बोलताना ऐकलेलं नाही. देश, संस्कृती, धर्म, भारताचे चिरंतनत्व, वैश्विक जबाबदारी, संघ कार्य व कार्यकर्ता एवढेच विषय व त्याचे स्पष्टीकरण ते मांडत. या एका गोष्टीसाठी सुद्धा ते महान ठरतात.

सामान्यपणे माहित असलेल्या श्री गुरूजींच्या गुणांशिवाय काही गोष्टी समजावून घेणे गरजेचे आहे. श्री गुरूजी १९४० ला सरसंघचालक झाले. १९४५ पासून फाळणीचे वारे वाहू लागले. १९४७ साली फाळणी झाली. या वेळचा संघ समजावून घेऊया.

संघात फक्त तरूण होते व फाळणी म्हणजे संघाचा मैदानावरील पराभव होता. तरूण संघ कार्यकर्ते किती संतप्त व वैफल्यग्रस्त झाले असतील, नव्हे होते. अशा वैफल्यग्रस्त कार्यकर्त्यांची फळी आणि विरूद्ध बाजूला राजकीय विद्वेषाने चालणारी सत्ता, विकृत विचारधारेनेग्रस्त वैचारिक क्षेत्र अशा सर्व अडचणींतून मार्ग काढून प्रवास करायचा होता या तरुण नेतृत्वाला. पराभूत मानसिकतेतील संघटनेला सुखरूप ध्येय पथावर मार्गक्रमित ठेवणे अशक्य



असते, ते श्री गुरूजींनी यशस्वी करून दाखवले हे त्यांचे महानपण आहे. इतर कोणाही नेत्याला हे शक्य झाले नसते. परंतू, 'मी'पण संपवलेल्या श्री गुरूजींना हे शक्य झाले. समोर संपूर्ण अंधार असताना स्वतःच ध्येयज्योत बनून श्री गुरूजींनी मार्गक्रमणा केली व कार्यकर्त्यांना पथदर्शन केले व उत्साहित सुद्धा! एखाद्या संघटनेच्या प्रमुखाला ध्येयाबाबत किती कठोर असावे लागते व व्यक्तिगत जीवनात किती नि:संग रहावे लागते याचे सर्वोच्च उदाहरण श्री गुरूजी यांनी स्वतःच्या आचरणातून घालून दिले. सामान्य कार्यकर्त्याला गोवधबंदी स्वाक्षरी आंदोलन दिले. वैफल्यग्रस्त मानसिकतेतून सामान्य स्वयंसेवकांना बाहेर काढले.

कम्युनिझमचा वैचारिक दरारा पूर्ण विश्वावर स्वार होता. त्यावेळी राष्ट्र, संस्कृती, संस्कार, धर्म या संकल्पना समाजात रुजवण्यासाठी कार्यकर्त्यांना वैचारिक बळ देण्याची अवघड जबाबदारी श्री गुरूजींवर येऊन पडली होती. त्यावेळीसर्वप्रथमत्यांनी,'कम्युनिझम हा स्वतःच्या वैचारिक विरोधाभासाने नष्ट होणार आहे' हे कार्यकर्त्यांना समजावून सांगितले व या वैचारिक लढ्याचे यशस्वी नेतृत्व केले. त्यांच्या मूलभूत चिंतनाची ताकद आज सर्व जग पहात आहे.

धर्म हे भारतीयतेचे मर्म आहे हे सांगण्यासाठी त्यांच्याहून योग्य व्यक्ती संघ कार्यपद्धतीला सापडणे शक्य नव्हते. त्यामुळे श्री गुरूजी हे असे संघटन प्रमुख होते, ज्यांना स्वतः लाच याची जाणीव होती की आपल्या संघटनेसाठी फक्त आपणच एक विशिष्ट योगदान देऊ शकतो आणि ते आपण दिलेच पाहिजे. म्हणूनच, संघाच्या भविष्यातील प्रवासासाठी, समाज आंदोलनांसाठी सामान्य समाज ज्या साधू–संताना मानतो त्यांना आपल्या या संघटनेसोबत उभे केले पाहिजे. त्यासाठी त्यांनी आध्यात्मिक क्षेत्रातील स्वतःचेअधिकार वापरून विश्व हिंदू परिषद स्थापन केली. संघटनेसाठी तिच्या प्रमुखाने केलेले हे सर्वात अभुतपूर्व योगदान होते. देशातील सर्व क्षेत्रे घुसळून टाकणारे रामजन्मभूमी आंदोलन हे या संघटनेने अंगीकृत केले व सर्व साधू–संत हिरारीने कामाला लागले.

आध्यात्मिक क्षेत्रात श्री गुरूजींचा अधिकार फार मोठा होता. एकदा श्री गुरूजी कांची कामकोटी पीठाचे शंकराचार्य श्रीमत् चंद्रशेखर सरस्वती यांना अचानक भेटायला गेले व तडक त्यांच्या कक्षात पोहोचले व थोड्या वेळाने निघून गेले. श्रीमत् चंद्रशेखर सरस्वती हे त्यावेळी पूजेच्या तयारीत होते आणि पूजा मोडली म्हणून त्यांच्या शिष्यांनी पुन्हा स्नानाची रचना सुरू केली. पण शंकराचार्यांनी सांगितले,''अरे, पूजा मोडली नाही तर पूर्ण झाली''. हा अधिकारसुद्धा संघटनेसाठी त्यांनी वापरला होता, असे होते श्री गुरूजी!

आपला स्वभाव बदलून, निरासक्तपण सोडून संघटनेसाठी ते भौतिक आयुष्य जगले. सामान्य माणसाला संघटित करण्यासाठी स्वतःकडे देवत्व येईल अशी कोणतीही कृती त्यांनी केली नाही.संघटना प्रमुख हा ध्येयवाद शिकवण्यासाठी असतो, ते त्यांनी अत्यंत कौशल्याने केले. संकटकाळी संघटन संयमाने नियंत्रित करायचे असते, हे त्यांनी गांधी हत्या प्रकरणी सिद्ध केले. ' 'हे त्यांचे प्रसिद्ध वाक्य व त्याला अनुरूप वर्तन त्यांनी करून दाखवले व फक्त तेच करू शकणार होते ती गोष्ट त्यांनी संघटनेसाठी केली ती म्हणजे देशातील यच्चयावत सांधु, संत व विविध पंथ प्रमुख यांचे व्यासपीठ उभे केले.


संघ संस्थापक डॉ. हेडगेवार यांनी जे अपेक्षिले होते त्याहून ओंजळभर अधिक देऊन श्री गुरुजींनी हा इहलोक प्रवास संपविला.

आज संघ स्थापनेचे शताब्दी वर्ष आहे. यात संघ स्वयंसेवकांना फार कौतुक असण्याचे कारण नाही. कारण संस्थापकांनाच राष्ट्रीय स्वयंसेवक संघांची ज्युबिली साजरी करावयाची नव्हती. पण आधुनिक संस्था जीवनाचा अनुभव नसलेल्या भारतात व हिंदू समाजात, त्याच समाजाचे संघटन करणे हे किती अशक्य कोटीतील होते हे समजून घेतले तर संघ शताब्दीचे महत्त्व जाणवेल. तात्कालिक समाज संघटना किती तकलादू कारणांनी तुटल्या, मोडल्या होत्या हे जर जाणले तर संघातील सरसंघचालकांच्या भूमिका व व्यवहार याचे अनन्यसाधारण महत्त्व समजेल. त्यातही श्री गुरुजींची कारकीर्द व आजचे संघटनेचे शताब्दी यश यातील अनन्यसाधारण महत्त्व समजेल. श्री गुरुजी हे मोक्ष रस्त्यावरील वाटसरु होते. लौकिक अर्थाने संन्यासी होते. अशावेळी भौतिक उद्दिष्टात फार मोठे चढ उतार झाले तर आधीच भौतिक जीवना विषयी निरिच्छ भाव असणारा माणूस कधीच तो रस्ता सोडून जाईल. पण श्री गुरुजी सर्वात कठीण काळात सर्वात स्थिर राहिले. त्यावेळचे त्यांचे वाक्य प्रसिद्ध आहे जर कुणीही जवळ नसेन तर मी परत पहिली शाखा सुरू करेन.

त्यांनी फाळणीतील अपमानकारक व अडचणीत आलेल्या हिंदू समाजाला व संघाला त्यातून बाहेर काढून एकसंघ ठेवला. आजच्या संघाचे यश हे त्यावेळी गुरुजींनी केलेल्या कुशल नेतृत्वात दडलेले आहे. आज श्री गुरुजी स्मरण करताना या गोष्टीकडेही जागृकतेने पहावेच लागेल.

मला वेगळे वाटलेले श्री गुरूजी असे होते.

आजही संघटनेसाठी, समाजासाठी, देशासाठी व जगासाठी त्यांच्या असामान्य कार्याचे स्मरण आणि चिंतन झाले पाहिजे.



## जात्यावरच्या ओव्या......

मावेना मांडवात
पाव्हणे- रावळे
कशी करू उठबस
सदरे मळती ढवळे ||६७७||

मावेना मांडवात
एका भावाचे लेकरं
दुधभाताच्या पंगती
चालल्यात बिनघोर ||६७८||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ३८


ज्योतिर्मय साहित्य

**मना प्रार्थना तुजला एक आहे।**
**रघुराज थक्कित होऊनि पाहे ।**
**अवज्ञा कदाही येदर्थी न कीजे।**
**मना सज्जना राघवी वस्ती कीजे।३८।**

अर्थ : या श्लोकात समर्थ मनाला प्रार्थना करतात की राघवाला एकवार तू थक्क होऊन पहा ( म्हणजेच त्याला समजून आणि जाणून घे ).मनाने तू कायम भगवंताजवळच वस्ती कर. माझ्या या विनंतीचा अवमान म्हणजे अवज्ञा कधीही करू नकोस.


(थक्कित - आश्चर्ययुक्त/ अद्भुत, येदर्थी - या बाबतीत )

विवेचन : आतापर्यंतच्या श्लोकांमध्ये समर्थांनी मनाला उपदेश केला आहे. या श्लोकात मात्र ते मनाला प्रार्थना करतात की हे मना परमेश्वराकडे तू थक्क होऊन पहा. समर्थांचे हे सांगणे सुरुवातीला आपल्याला थोडे विचित्र वाटते. पण त्यात खूप गहन अर्थ भरलेला आहे.



एखाद्या गोष्टीकडे आपण थक्क किंवा आश्चर्यचकित होऊन केव्हा पाहतो तर ज्यावेळी त्या गोष्टीचा कार्यकारण भाव आपल्याला समजत नाही. आपल्या समजण्याच्या पलीकडे ती गोष्ट असते तेव्हा आपण त्या गोष्टीकडे एखादी अद्भुत गोष्ट म्हणून पाहतो.

ज्यावेळी पहिल्यांदा वाफेवरचे पहिले रेल्वे इंजिन धावले आणि त्याच्या सहाय्याने रेल्वे धावली, त्यावेळी लोकांनी थक्क होऊन तिच्याकडे पाहिले. ही गोष्ट त्यांच्या दृष्टीने अद्भुत होती.




बैल, घोडे किंवा ओढणारे कोणीही नसताना ही गाडी कशी चालते याचे कोडे सर्वसामान्यांना पडले होते. पण जेव्हा ही गोष्ट त्यांना नित्याची झाली आणि त्यामागील कार्यकारण भाव समजला तेव्हा तिचे आश्चर्य त्यांना वाटेनासे झाले. हळूहळू ते तंत्रज्ञान आपण जाणून घेतले, त्याचा अभ्यास केला. त्यात पुढे प्रगती झाली. विजेवर, डिझेलवर धावणाऱ्या रेल्वे इंजिनांची निर्मिती झाली. त्यासाठी त्या तंत्रज्ञानाच्या सानिध्यात आपल्याला जावे लागते.

तशीच ईश्वराने निर्मिलेली ही सृष्टी अद्भुत आहे. चंद्र, सूर्य, तारांगणे, मेघमाला, निरनिराळे प्राणी, पक्षी, वनस्पती आणि सूक्ष्मजीव पाहिले की थक्क व्हायला होते. या गोष्टी एकदा काळजीपूर्वक पाहिल्या की त्याच्या मागील कार्यकारण भाव जाणून घेता येईल. एखादे तंत्रज्ञान जाणून घ्यायचे असेल तर ज्याने ते निर्माण केले आहे त्याच्याजवळ जाऊन आपल्याला ते शिकावे लागते. या सृष्टीचा निर्माता ईश्वर आहे. तिचा कार्यकारणभाव जाणून घेण्यासाठी भगवंताला शरण जावे लागेल. **(क्रमशः)**





## || संजय उवाच... ||

@संजय काव्या पुणे 7743918559



✍️ ताण (स्ट्रेस )

ताण (स्ट्रेस) हा आरोग्यासाठी खूप घातक आहे, प्रत्येक समस्येचे निरसन हे होतच असते फक्त त्यासाठी थोडा वेळ वाट पहाणे गरजेचे असते, स्ट्रेस घेऊन कुठलाच प्रश्न सुटत नसतो. म्हणून डोकं शांत ठेवावे म्हणजे सर्व व्यवस्थित होते.



## श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## परमात्म्यावर पूर्ण निष्ठा पाहिजे

ज्योतिर्मय साहित्य

आईकरिता रडत असलेले मूल आई भेटल्याशिवाय रडणे थांबवत नाही, त्याप्रमाणे, समाधानाकरिता, आनंदाकरिता, धडपडणारा आपला जीव, परमेश्वर प्राप्त झाल्याशिवाय शांत राहू शकत नाही. म्हणून प्रपंचाची काळजी न करता, परमेश्वराची प्राप्ती कशी होईल याची काळजी करा. भगवंतावर संपूर्णपणे निष्ठा ठेवल्याशिवाय आपली प्रपंचाची काळजी दूर होणार नाही. सर्व जगताचा जो पालनकर्ता, तो आपले पालन नाही का करणार ? प्रत्येक गोष्ट त्याच्याच सत्तेने होते हे लक्षात ठेवा, मग प्रपंच कधीही बाधक होणार नाही. एक भगवंतावरची निष्ठा मात्र शेवटच्या श्वासापर्यंत सांभाळा. आपण पुराणात वाचलेच आहे की, भीष्माने पांडवांना मारण्याची प्रतिज्ञा केली. भीष्मप्रतिज्ञाच ती, मग ती खोटी कशी होऊ शकेल? सर्व पांडव चिंताग्रस्त झाले, पण द्रौपदीची निष्ठा मात्र जबरदस्त होती. ती म्हणाली, ''आपण श्रीकृष्णाला विचारू.'' तिने सर्व वृत्तांत त्याला कथन केला. श्रीकृष्ण म्हणाला, ''भीष्माची प्रतिज्ञा खोटी कशी होईल ? तरी आपण एक प्रयत्न करून बघू.'' तो म्हणाला, ''द्रौपदी, तू आता असे कर, रात्री भीष्माचार्यांच्या आश्रमात जा. तिथे फक्त संन्याशांना आणि स्त्रियांना मुभा आहे. मी तुझ्याबरोबर आश्रमापर्यंत येतो.'' त्यानंतर श्रीकृष्ण द्रौपदीला घेऊन भीष्माचार्यांच्या आश्रमापर्यंत गेले आणि बाहेरच तिचे अलंकार आणि इतर वस्तू सांभाळत बसले. श्रीकृष्णांनी तिला आत जाताना सांगितले की, ''भीष्माचार्य आता झोपत आहेत, अशा वेळी तू आत जा आणि बांगड्या वाजवून नमस्कार कर.'' त्याप्रमाणे द्रौपदी आत गेली, आणि बांगड्या वाजवून भीष्माचार्यांना तिने नमस्कार केला. त्यांनी लगेच तिला ''अखंड सौभाग्यवती भव'' म्हणून आशीर्वाद दिला. मग त्यांनी पाहिले तो द्रौपदी ! तेव्हा ते म्हणाले, ''द्रौपदी ही अक्कल तुझी खचित नव्हे; तुझ्याबरोबर कोण आहे ते सांग.'' ती म्हणाली, ''माझ्याबरोबर गडी आणला आहे; तो बाहेर उभा आहे.'' भीष्माचार्यांनी बाहेर येऊन पाहिले. त्यांनी श्रीकृष्णाला ओळखले, परंतु आता सर्व काम होऊन चुकले होते. म्हणून म्हणतो, परमात्म्यावर पूर्ण निष्ठा पाहिजे. या निष्ठेच्या आड जर काही येत असेल तर तो म्हणजे आपला अभिमान. हा अभिमान सर्वांना घातक आहे. तो घालवण्यासाठीच परमात्म्याला वारंवार अवतार घेणे भाग पडले. ही अभिमानाची हरळी नाहीशी व्हायला भगवंताच्या नामासारखा दुसरा उपाय नाही. नामावर प्रह्लादाने जशी निष्ठा ठेवली तशी ठेवावी. त्याने नाम श्रद्धेने घेतले आणि निर्विषय होण्याकरिता घेतले, आपण ते विषयासाठी घेऊ नये. नामापरते दुसरे सत्य नाही हे समजावे. याच जन्मात हे नाम शांतीचा आणि समाधानाचा ठेवा मिळवून देईल.

नामस्मरणात स्त्रीपुरूष, श्रीमंतगरीब, हे भेद नाहीत. फक्त ते श्रद्धेने घेणे जरूर आहे.

***

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर, पुणे

## संतांची दिवाळी

हिंदू धर्मात दिवाळी या सणाचे अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. या दिवाळीची प्रतीक्षा, लहान थोर सर्वजण करीत असतात. त्यानिमित्ताने का होईना, सर्व आप्तांच्या भेटीगाठी, गोड गोड खाणे, प्रकाशाची उधळण, दिव्यांची आरास, फटाक्यांची आतषबाजी या साऱ्यांनी प्रत्येक जणच आनंदित होत असतो. आणि या आठवणी पुढील अनेक दिवस मनात साठवून ठेवीत असतो.

आज पासूनच दिवाळीची सुरुवात झाली आहे. आपण सामान्य लोक दिवाळीही जशी वैभवाने, आनंदाने साजरी करतो, तशी *संत मंडळी* दिवाळी कशी साजरी करीत असावीत? असा प्रश्न ,आमचे एक विद्वान मित्र यांना पडला, व त्यांनी मला याविषयी कांही लिहा, असे मत व्यक्त केले. त्यांच्या इच्छे नुसार संतांची दिवाळी याविषयी मी अल्प असे लिहिण्याचा प्रयत्न करणार आहे. आपण दिवाळी म्हणजे फटाके, फराळ, मिष्टान्न,अलंकार, आतषबाजी हे जणू समीकरण करून टाकले आहे.

संत मंडळी ही याच समीकरणाला दिवाळी समजत असतील काय? तर नाही. त्यांच्या दृष्टीने दिवाळी म्हणजे काय? हेही आपण आता पाहू.

सण दिवाळीचा आला/ नामा राऊळाशी गेला// देव तेथून चालिले/ नामयाच्या घरा आले// गोणाईने उटणे केले/ दामाशेटीने स्नान केले/ पदर काढीला माथ्याचा/ बाळ पुशीला नंदाचा// हाती घेऊनी आरती/ चक्रपाणि ओवाळीती// जेऊनिया तृप्त झाले /दासी जनीने विडे दिले//




### मुलामुली मधील टोकाची आक्रमकता का?

समाज हा व्यक्ती व कुटुंब याचे प्रतिबिंब असतो. समाजामधे पुर्वी सामाजिक निती मानदंड होते. पण आज स्वतःच्या मनाप्रमाणे वागणे हाच विचार प्रभावी दिसतो. लहानमोठा भेद दिसत नाही.

"मी व माझे विश्व इतकचं जग झाल्यामुळे ताणतणाव, तेही मुलामुलीत जास्त दिसत आहे. व आक्रमकता वाढत आहे त्यामुळे राग व मागोमाग अनेक तरंग निर्माण होतात. पण कुठे राग आल्यावर कशा पद्धतीने व्यक्त करायचा हे शिकवले जात नाही. मजा करा, कोणी टोकले तर, मधे आले तर त्यांना बाजूला करा.

दिखाऊपणाला महत्व येत असल्याने शानशोक व्यसनाचा आग्रह दिसत आहे शॉपिंग, मिडिया, मोबाईल अतिरेक हॉटेलिंग ही व्यसने आहेत.. बाहेरून राहण्यापेक्षा आतील घटक आज पाहात नाही, त्यामुळे कुटुंब समाजात अतिरेकी घटना वाढल्या. हे सर्व कमी झाले तरच सुखदुःखाचे भावभावनाचे तरंग आटोक्यात राहतील,

म्हणून व्यक्तीगत पालक व समाजात व्यक्ती व कुटुंब हे वस्तूपेक्षा मोठे हा विचार रुजवला पाहिजे असे मला वाटते. अजूनही माणसाला माणसाची गरज आहे, एआय ची मशीनची नाही.! तर संवादाची जागा विसंवाद घेऊन दुष्टचक्र सुरू होते. म्हणून बी अलर्ट टेक केअर गूड़ डे व्हेरी गूड़ मार्निंग आणि ईथे थांबतो. हॅपी थाट्स मेक्स मॅन ईझी. आनंदी राहा व सुखदुःखाचे तरंग माणसा-माणसाचे वाचत राहा.




## मासिक पाळीतील रक्तस्त्राव

ज्योतिर्मय साहित्य

१) साबूत धणे : अर्धा ग्लास पाण्यामध्ये थोडेसे साबूत धणे उकळा. जेव्हा पाणी गार होईल, तेव्हा त्या पाण्याचे सेवन करा. असे केल्याने तुम्हाला नक्कीच फायदा होईल.

२) चिंच : यात फायबर आणि एंटीऑक्सीडेंट्स असतात, जे रक्ताला जमवण्यात मदत करतो आणि जास्त ब्लीडिंग होण्यापासून बचाव करतो. जर तुम्हाला असे वाटत असेल की फार जास्त ब्लीडिंग होत आहे, तर एक चिंचेचा तुकडा नक्की खा.

३) सिट्रस फळं : व्हिटॅमिन सी, जास्त ब्लीडिंग होण्यापासून रोखतो. मासिक पाळीच्या वेळेस जर तुम्ही संत्र्याचा ज्यूस दिवसातून दोन वेळा प्यायले तर नक्कीच फायदा होईल.

४) ब्रॉक्ली : हिरव्या भाज्यांमध्ये व्हिटॅमिन असतं, जे रक्त जमण्यास मदत करतो. म्हणून जेव्हा जास्त ब्लीडिंग होत असेल तेव्हा आपल्या आहारात हिरव्या भाज्यांना प्राधान्य द्या.

५) मुळा : मुळा रक्त जमवण्यास मदत करतो. मुळी शिजवताना, यात मुळ्याचे पान देखील टाकावे. या भाजीला पीरियड्सच्या वेळेस जरूर सेवन केले पाहिजे ज्याने ब्लड फ्लो कंट्रोलमध्ये राहील.

६) पपीता : तसं तर पपीता पीरियड्स होण्यास मदत करतो. पण कच्च्या पपितेचे सेवन पीरियड्सच्या दिवसांमध्ये केल्याने जास्त ब्लड फ्लो होत नाही. या दिवसांमध्ये तुम्ही कच्च्या पपितेचे दोन पीस खाऊ शकता.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

७) आवळा : आवळा किंवा आवळ्याचा ज्यूस, भारी ब्लीडिंगला रोखतो. या ज्यूसला दिवसातून दोन वेळा प्या आणि या समस्येपासून सुटकारा मिळवा. ज्यूस प्यायला नंतर थोडेसे मिठाचे सेवन जरूर करा, ज्याने तुमचा गळा खराब होणार नाही.

८) दालचिनी (कलमी) : दालचिनीचे तुकडे उकळत्या पाण्यात टाकून ते पाणी प्यायला पाहिजे.

९) कारली : कारल्याच्या भाजीचे सेवन केल्याने देखील फायदा होतो. ही भाजी हेवी ब्लीडिंगला कंट्रोल करू शकते.

१० एलोवेरा : एलोवेराचा ज्यूस दिवसातून दोन वेळा प्यायला पाहिजे.

**

## प्रभातपुष्प

### षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे (काव्यसंध्या)
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

माझे मन

सुंदर,चंचल,हळवे
नितळ,निर्मळ असे
आहे माझे मन
माझ्या सोबत जोडलेल्या
नात्यांच्या या आठवणींचे
जपले अनमोल धन

माझे मन आहे
साधे,सरळ,छान
मदतीस तयार असते
सतत बदल होताना
दुःखात रडते नि
आनंदात छान हसते

# शिवराज्याभिषेक : स्वाभिमानाच्या सूर्याचा सुवर्णोदय

**ज्योतिर्मय साहित्य**

भारतीय इतिहासाच्या विशाल आकाशात अनेक राजे उदयास आले, अनेक साम्राज्ये उभी राहिली आणि काळाच्या ओघात लयालाही गेली; परंतु काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की ती केवळ इतिहास घडवत नाहीत, तर इतिहासालाच नवी दिशा देतात. छत्रपती शिवाजी महाराज हे असेच एक युगप्रवर्तक व्यक्तिमत्त्व! त्यांचा राज्याभिषेक हा केवळ एका राजाचा सिंहासनारोहण सोहळा नव्हता, तर तो गुलामीच्या अंधारात हरवलेल्या स्वाभिमानाचा सुवर्णोदय होता. ६ जून १६७४ रोजी रायगडाच्या पवित्र भूमीवर घडलेला शिवराज्याभिषेक हा महाराष्ट्राच्या नव्हे, तर संपूर्ण भारताच्या आत्मसन्मानाचा मंगल सोहळा ठरला.

ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीचा तो सुवर्णक्षण! रायगडाच्या राजसभेत इतिहास नव्या तेजाने उजळून निघाला होता. सह्याद्रीच्या उंच शिखरांवरून उगवणाऱ्या सूर्यालाही त्या दिवशी जणू आपल्या तेजाचा अभिमान वाटत नव्हता, कारण रायगडावर एक असा तेजस्वी सूर्य विराजमान होणार होता, ज्याच्या कर्तृत्वाच्या प्रकाशाने संपूर्ण भारतभूमी उजळून निघाली होती.

राज्याभिषेकाच्या मंगलक्षणी छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वरूप विलक्षण तेजोमय भासत होते. मस्तकी रत्नजडित मुकुट, कपाळी केशरी गंधाचा तेजस्वी टिळा, अंगावर भरजरी राजवस्त्रे, गळ्यात मोत्यांचे आणि रत्नांचे हार, कमरेला भवानी तलवार आणि मुखमंडलावर सिंहासारखे तेज! त्यांच्या डोळ्यांत करुणा आणि कठोरता यांचा अद्भुत संगम दिसत होता. ते डोळे रयतेसाठी प्रेमाने ओलावलेले होते, तर अन्यायाविरुद्ध वज्रासारखे कठोर होते.

महाराजांचे व्यक्तिमत्त्व त्या दिवशी केवळ एका राजाचे नव्हते; ते स्वराज्याच्या मूर्त स्वरूपाचे दर्शन घडवत होते. त्यांच्या चेहऱ्यावर विजयाचा गर्व नव्हता, तर प्रजेच्या कल्याणाची जबाबदारी स्वीकारणाऱ्या लोकनायकाचे गांभीर्य होते. सुवर्ण सिंहासनावर विराजमान झालेल्या शिवरायांचे तेज इतके दिव्य होते की, सभागृहातील प्रत्येक मानकरी आदराने नतमस्तक झाला होता.

रायगडाच्या राजसभेत वेदमंत्रांचा घोष सुरू असताना महाराजांचे व्यक्तिमत्त्व जणू प्राचीन भारताच्या वैभवाचे प्रतीक बनले होते. त्यांच्या अंगी श्रीरामांचे आदर्श नेतृत्व, श्रीकृष्णांची मुत्सद्देगिरी आणि महादेवाचे रौद्र-करुण स्वरूप एकवटल्याचा भास होत होता. त्यांच्या तेजस्वी मुखाकडे पाहताना उपस्थितांना केवळ राजा नव्हे, तर युगपुरुषाचे दर्शन घडत होते.

राजमाता जिजाबाई यांच्या संस्कारांनी घडलेला हा पुत्र त्या दिवशी हिंदवी स्वराज्याचा सार्वभौम छत्रपती म्हणून सिंहासनावर आरूढ झाला. त्यांच्या मुखावर समाधानाचे तेज होते, कारण अनेक वर्षांच्या संघर्षानंतर स्वराज्याला वैधता आणि गौरव प्राप्त झाला होता.

शिवराज्याभिषेकाच्या दिवशी शिवाजी महाराजांचे तेज हे केवळ अलंकारांचे किंवा राजवैभवाचे नव्हते; ते त्याग, पराक्रम, न्यायनिष्ठा, दूरदृष्टी आणि राष्ट्रप्रेम यांच्या दिव्य संगमातून निर्माण झालेले तेज होते. म्हणूनच रायगडावरील त्या सुवर्णक्षणी शिवरायांचे रूप पाहून जनतेच्या मनात एकच भावना जागृत झालीहा राजा नसून रयतेचा रक्षक, स्वाभिमानाचा दीपस्तंभ आणि स्वराज्याचा साक्षात सूर्य आहे.

आजही शिवराज्याभिषेकाचा विचार मनात आला की, सुवर्णसिंहासनावर विराजमान झालेली ती तेजपुंज मूर्ती डोळ्यांसमोर उभी राहते आणि हृदय अभिमानाने भरून जाते. कारण त्या दिवशी रायगडावर एका राजाचा राज्याभिषेक झाला नव्हता, तर स्वाभिमान, स्वातंत्र्य आणि लोककल्याण या मूल्यांचा राज्याभिषेक झाला होता. ''छत्रपती शिवाजी महाराज'' हे नाव म्हणूनच आजही तेज, प्रेरणा आणि अस्मितेचे अखंड प्रतीक आहे.



रायगडाच्या कडेकपाऱ्यांत त्या दिवशी इतिहासाने स्वतःचा श्वास रोखून धरला होता. सह्याद्रीच्या उंच शिखरांनी जणू आनंदाने मस्तक उंचावले होते. आकाशातील सूर्यही त्या दिवशी अधिक तेजस्वी भासत होता, कारण भूमीवर दुसरा एक सूर्य उदयास येत होतास्वराज्याचा सूर्य! गडाच्या प्रत्येक दगडातून, प्रत्येक वाऱ्याच्या झुळुकीतून आणि प्रत्येक भगव्या पताकेतून एकच जयघोष घुमत होता''जय भवानी, जय शिवाजी!''

शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले स्वराज्य हे केवळ भूभागाचे राज्य नव्हते; ते विचारांचे, संस्कृतीचे, न्यायाचे आणि लोककल्याणाचे राज्य होते. परकीय सत्तांच्या सावलीत दबलेल्या जनतेच्या मनात स्वातंत्र्याची ज्योत पेटविण्याचे कार्य महाराजांनी केले. त्यांनी तलवारीच्या धारेवर स्वराज्य निर्माण केले, पण त्याचा पाया न्याय, नीतिमत्ता आणि लोकहितावर उभारला. म्हणूनच शिवराज्याभिषेक हा एका व्यक्तीच्या यशाचा उत्सव नसून जनतेच्या स्वप्नपूर्तीचा सोहळा होता.

राज्याभिषेकासाठी काशीचे विद्वान पंडित गागाभट्ट यांना निमंत्रित करण्यात आले होते. शास्त्रानुसार सर्व विधी संपन्न करण्यात आले. सुवर्णकलशातील पवित्र जलाने महाराजांचा अभिषेक झाला. वेदमंत्रांच्या मंगल ध्वनीने रायगडाचा परिसर दुमदुमून गेला. त्या क्षणी जणू सह्याद्रीने आपल्या कुशीत वाढवलेल्या पुत्राला सार्वभौमत्वाचा मुकुट अर्पण केला. सिंहासनावर विराजमान होताना शिवराय हे केवळ भोसले घराण्याचे प्रतिनिधी नव्हते; ते संपूर्ण रयतेच्या आशा-आकांक्षांचे प्रतीक बनले होते.

सुनिता कावसनकर
छत्रपती संभाजीनगर
मो. 83908 19446



शिवराज्याभिषेकाचे महत्त्व केवळ धार्मिक किंवा राजकीय नव्हते. त्या काळात भारतातील अनेक भाग परकीय सत्तांच्या अधिपत्याखाली होते. हिंदवी स्वराज्याची संकल्पना अनेकांना अशक्य वाटत होती. अशा परिस्थितीत शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक म्हणजे आत्मविश्वासाचा घोष होता. हा सोहळा जगाला सांगणारा होता की, या भूमीतील जनता स्वतःचे राज्य निर्माण करण्यास समर्थ आहे. हा क्षण गुलामीच्या मानसिकतेवर विजय मिळवणारा होता.

रायगडावरील सिंहासन हे केवळ सोन्याचे नव्हते; ते त्याग, पराक्रम, दूरदृष्टी आणि राष्ट्रनिष्ठेच्या अमूल्य रत्नांनी सजलेले होते. त्या सिंहासनावर बसण्यासाठी महाराजांनी बालवयापासून संकटांशी झुंज दिली होती. तोरणा, राजगड, प्रतापगड, सिंहगड यांसारख्या दुर्गांवर फडकणारा भगवा हा त्यांच्या अथक प्रयत्नांचा साक्षीदार होता. अफझलखानाचा वध, पन्हाळगडातून सुटका, आग्र्यातील नजरकैदेतून पलायन आणि असंख्य मोहिमाया सर्व संघर्षांचे सार म्हणजे शिवराज्याभिषेक!

या सोहळ्यामागे राजमाता जिजाबाई यांचे अथांग योगदान होते. शिवबांच्या मनात स्वराज्याचे बीज रोवणाऱ्या जिजाऊंनी आयुष्यभर एका स्वप्नासाठी तपश्चर्या केली. रायगडावर पुत्राच्या राज्याभिषेकाचा क्षण पाहताना त्यांच्या डोळ्यांत समाधानाचे अश्रू दाटले असतील. तो क्षण म्हणजे मातृत्वाच्या संघर्षाचा विजय होता. जिजाऊंच्या संस्कारांचा, धैर्याचा आणि दूरदृष्टीचा तो सर्वोच्च सन्मान होता.

शिवराज्याभिषेकाने महाराष्ट्राला नवे राजकीय अस्तित्व दिले. यानंतर स्वराज्याला अधिकृत सार्वभौम मान्यता मिळाली. प्रशासन अधिक संघटित झाले. न्यायव्यवस्था, महसूल पद्धती, आरमार आणि संरक्षण व्यवस्था अधिक सक्षम झाली. महाराजांनी राज्यकारभारात लोकहिताला सर्वोच्च स्थान दिले. त्यांच्या राज्यात स्त्रियांचा सन्मान, शेतकऱ्यांचे संरक्षण आणि सर्वधर्मसमभाव यांना विशेष महत्त्व होते. त्यामुळे शिवराज्याभिषेक हा सुशासनाच्या नव्या पर्वाचा प्रारंभ ठरला.

आजही शिवराज्याभिषेकाची आठवण मनात अभिमानाचे तरंग निर्माण करते. हा सोहळा आपल्याला स्वाभिमान, राष्ट्रप्रेम आणि कर्तव्यनिष्ठेची प्रेरणा देतो. शिवाजी महाराजांचे कार्य हे काळाच्या मर्यादांपलीकडचे आहे. त्यांच्या राज्याभिषेकाचा संदेश आजही तितकाच जिवंत आहेअन्यायाविरुद्ध संघर्ष करा, स्वत्व जपा आणि समाजहितासाठी कार्य करा.

शिवराज्याभिषेक हा इतिहासातील एक दिवस नाही; तो भारतीय अस्मितेचा अखंड दीपस्तंभ आहे. रायगडावर प्रज्वलित झालेली ती ज्योत आजही प्रत्येक मराठी मनात, प्रत्येक भारतीयाच्या हृदयात तेजाने प्रज्वलित आहे. स्वराज्याच्या त्या सुवर्णक्षणाने जगाला दाखवून दिले की, दृढनिश्चय, पराक्रम आणि लोककल्याणाची भावना असेल, तर कोणतेही स्वप्न अशक्य नसते.

छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक म्हणजे सह्याद्रीच्या कणखर छातीवर कोरलेला स्वाभिमानाचा सुवर्णलेख! तो इतिहासाचा केवळ अध्याय नाही, तर पिढ्यान्पिढ्या प्रेरणा देणारा अमर महाकाव्याचा मंगल श्लोक आहे. ''शिवराज्याभिषेक'' हे नाव उच्चारताच आजही मनात अभिमानाचे रणशिंग निनादते आणि हृदयातून सहज उद्गार फुटतात

रायगडाच्या कड्यावर स्वाभिमानाचा सूर्य उगवला,
सह्याद्रीच्या शिखरांनी आनंदाचा शेला पांघरला।
वेदमंत्रांच्या निनादात दुमदुमल्या दिशा दाही,
भगव्या ध्वजाच्या साक्षीने दिली स्वराज्याची ग्वाही।
सुवर्णसिंहासनी विराजला पराक्रमाचा तेजोदीप,
रयतेच्या आशांचा झाला त्या क्षणी मंगल कल्पदीप।
शिवराज्याभिषेकाने उजळली भारतभूमी पावन,
''जय भवानी, जय शिवाजी!'' निनादे आजही गगन।।

# सुविधांपेक्षा सुख महत्त्वाचे

**ज्योतिर्मय साहित्य**

भौतिक सुख आणि सुविधा म्हणजे आपल्या सांसारिक जीवनाला अधिक आरामदायक, सोयीस्कर आणि सुलभ बनवणारे भौतिक घटक, जसे की निवास, बंगला, गाडी, पंखा, फ्रीज, उत्तम अन्न आणि कपडे. या सामान्य आवश्यकतेच्या वस्तू आहेत. परंतु त्या अधिक किमतीच्या आणि त्यात अधिक सोय असलेल्या असा हट्ट पुर्वक मानसिक आग्रह असणे यामुळे मानसिक शांतता भंग होते आणि वास्तविक आनंद मिळत नाही. या गोष्टी तात्पुरता शारीरिक आराम आणि आनंद देतात, परंतु त्या शाश्वत किंवा कायमस्वरूपी आंतरिक आनंदाची हमी देऊ शकत नाहीत. म्हणूनच कुठेतरी अंतरिक आनंदाची आवश्यकता भासते आणि त्यावर विचार करणे गरजेचे ठरते.

खरा आणि अधिक वेळ टिकणारा आनंद संतोष वृत्तीतून येत असतो. जे काही उपलब्ध आहे त्यात सुख आणि समाधान मानणे हिताचे ठरते. आपली कुवत नसलेल्या किमतीच्या वस्तू मिळवण्यासाठी माणूस अन्य प्रकारे प्रयत्न करत असतो. यातूनच अनैतिकतेचा जन्म होतो. भौतिकतेवर आधारित



जीवनशैलीचा अधिक अवलंब आणि त्या सुविधांचा संग्रह यातूनच निर्दयता, अनैतिकता, स्वार्थ, अशा वृत्ती जन्माला येतात.

वर्तमान काळानुसार शारीरिक गरजा पूर्ण करणे जसे की अन्न, निवारा आणि आरामदायी जीवनमान त्यात मोबाइल, गाडी, ए.सी., फ्रिज, उत्तम घर इत्यादींचा समावेश होतो. परंतु यापासून मिळणारी, अशा प्रकारची भौतिक सुखं मर्यादित काळासाठी आनंद देतात; एकदा या भौतिक वस्तूंच्या वापराची अती सवय झाली की त्यातील आनंद दिवसेंदिवस कमी होतो. म्हणूनच माणूस भौतिक सुखाच्या प्राप्तीसाठी अन्य प्रकारे वस्तूंच्या प्राप्तीच्या शोधात अनैतिक, वाम का मग मार्गाचा अवलंब करत असतो

सुविधा याचा अर्थ म्हणजे साधन (उदा. पंखा), तर सुख म्हणजे त्या साधनामुळे मिळणारा मानसिक आनंद किंवा समाधान. भौतिक सुविधा गरजेच्या आहेत, परंतु त्या एका मर्यादेपर्यंत असाव्यात. वास्तविक पाहता बाह्य व्यवस्था आहेत. सुख आणि शांती अंतरीक अवस्था आहेत. कोणी सर्व व्यवस्था असून बेचैन असू शकतो तर कोणी अत्यंतिक उणिवा असूनही सुखी

© बलराज संघई
(एम.ए. अहिंसा शांति शोध)
छत्रपती संभाजीनगर
9420015108



सुखी आयुष्यासाठी मानवी मूल्ये जसे की विश्वास, आदर, प्रेम करुणा, दया संतोष वृत्ती हे जसे महत्वाचे तसेच त्यासाठी आत्मिक साधना, विवेक पूर्णता आणि आध्यात्मिक विचाराची जाणीव असणे तितकेच महत्त्वाचे आहे. थोडक्यात, भौतिक सुविधा आपल्या शरीरासाठी आवश्यक आहेत, परंतु मानसिक समाधान हे विचार आणि अंतर्गत समतोलावर अवलंबून असते.

धन, वैभव भौतिक सुविधा देते. सुविधा आणि सुख यामध्ये मोठा फरक आहे. सुविधा, सोय, पूर्तता या असतो. आहे त्या परिस्थितीत सुख आणि शांतीत राहण्याची मानसिक तयारी, सवय असावी.

प्रश्न वैभवाचा नाही तर आंतरिक चेतनेचा आहे. मनाची गुलामी सोडावी. वर्तमानात चेतना जागृत असावी. उद्या वैभव, प्रेम मिळेल त्या वेळी जगू हा विचार निरर्थक आहे. वर्तमान क्षण शाश्वत सत्य आहे, केवळ तो क्षण भूतकाळातील स्मृती आणि भविष्याच्या कल्पना सोडून जगावा. अर्थात चेतना जागृत असणे. तेंव्हाच आपण आपले मालक असतो. सुख शांतित असतो. म्हणूनच वर्तमानातील क्षण हा भौतिकतेच्या अधिक आहारी न जाता, विवेक पूर्णतेत, संतोष वृत्तीने जगण्याचा प्रयत्न करत असतानाच वास्तविक आत्मिक समाधान आणि सुख लाभेल.

शरीर आहे आणि आयुष्य आहे म्हणून जगणे क्रमप्राप्त ठरते, परंतु या जगण्यासाठी भौतिकतेचा किती प्रमाणात अवलंब करायचा हा विचार अत्यंत महत्त्वाचा आहे. विवेक पूर्ण अध्यात्मिक चेतना जागृत असेल तर त्याचा परिणाम जीवनशैलीवर नक्कीच असणार यात शंका नाही. त्यातूनच वास्तविक समाधान शांती लाभेल.

सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.
■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,
गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.
सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.
Dr Shaikh A H - 98606 99906



# शेखचिल्ली

विभावरी कुलकर्णी 8087810197

पुढे....
पण पावसाचं पाणी जमिनीत मुरवण्यासाठी आपण जागाच शिल्लक ठेवली नाही. जमिनीला सिमेंटने पूर्णपणे 'पॅक' करून टाकलं आहे.
असे आधुनिक शेखचिल्ली विविध रूपात आपल्याला दिसतात. ते फक्त निसर्गा कडून घेतात. देत मात्र काहीच नाहीत.
त्यात प्लॅस्टिकचा अमर्याद वापर करणारे आहेत. त्यामुळे पृथ्वीला गुदमरून टाकत आहोत.
त्याचे तोटे आपण अनुभवत आहोत. तरीही सावध होत नाही.
विविध मॉल, मोठ्या इमारती बांधण्यासाठी झाडे तोडत आहोत.
विकासाच्या नावाखाली टेकड्या फोडल्या जात आहेत.
नाद्यांचे पाणी प्रदूषित करत आहोत.
नदीत कचरा टाकू नये हे खरे तर कळायला हवे. परंतु ज्या नद्यांवर कचरा टाकू नये म्हणून जाळ्या बसवलेल्या असतात तेथे लोक गाडयांवर उभे राहून प्लॅस्टिक पिशवीत आणलेला कचरा व्हॉली बॉल प्रमाणे नदीत फेकतात.
नदीत रसायनयुक्त पाणी सोडतात. यात आपलेच नुकसान होत आहे.
विविध कीटक नाशके घरात, परिसरात वापरून निसर्गातील अन्न साखळीवर परिणाम होत आहे. कीटक अभ्यासक कायम सांगत असतात,
'कोणतेही किडे मारू नका. तर ते निसर्गात सोडा. ते अन्नसाखळीचा घटक असतात.' पण आपण हायजीन म्हणून इतक्या अतिरेकी खुळचट कल्पना बाळगून स्वतःचे नुकसान करुन घेत आहोत.
नैसर्गिक साधन संपत्तीचा अमर्याद उपसा करत आहोत.
"निसर्ग प्रत्येकाची गरज पूर्ण करू शकतो, पण कोणाचाही हव्यास पूर्ण करू शकत नाही." असे महात्मा गांधी म्हणायचे.
जर आपण वेळीच सावध झालो नाही, तर शेखचिल्ली प्रमाणे जमिनीवर आदळणं अटळ आहे. आज आपण निसर्गाचा जो नाश करतोय, त्याची परतफेड उद्याच्या पिढीला करावी लागणार आहे.
झाडे लावा, झाडे जगवा: हे केवळ घोषवाक्य नसून ती काळाची गरज आहे.
प्लॅस्टिकचा वापर टाळणे आणि कचऱ्याचे व्यवस्थापन करणे ही आपली वैयक्तिक जबाबदारी आहे. क्रमश:....

# कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे



© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495

## यथार्थ किंवा आंतरिक गीता (रहस्य शोध) हृदयस्पर्शी...

पुढे.....
■ थोडक्यात: साधनेचे तीन मुख्य आधार या श्लोकाच्या अंतर्गत व्याख्येनुसार, अध्यात्माच्या मार्गावर प्रगती करण्यासाठी तीन गोष्टी अत्यंत आवश्यक आहेत:
१. इंद्रियनिग्रह (श्रीकृष्ण/पाचजन्य): इंद्रियांना विषयांवरून हटवून देवाकडे वळवणे.
२. अनुराग व वैराग्य (अर्जुन/देवदत्त): ईश्वराच्या प्राप्तीची तीव्र ओढ असणे.
३. भाव व प्रीती (भीम/पौंड्र): हृदयात दृढ श्रद्धा आणि प्रेम असणे.
थोडक्यात सांगायचे तर, जेव्हा साधक आपल्या इंद्रियांवर ताबा मिळवतो (श्रीकृष्ण), मनात तीव्र तळमळ निर्माण करतो (अर्जुन) आणि अफाट भावशक्ती प्रकट करतो (भीम), तेव्हा त्याच्या अंत:करणात असुरी प्रवृत्तींविरुद्धच्या युद्धाची यशस्वी सुरुवात होते.
वरवर केवळ एक युद्धाचे मैदान किंवा शंखांचे आवाज वाटतात, त्यामागे मानवी मनाचे आणि साधनेचे इतके सखोल मानसशास्त्र दडलेले असते. या विवेचनातील काही गोष्टी थेट हृदयाला स्पर्श करतात, कारण त्या आपल्या रोजच्या जगण्याशी जोडलेल्या आहेत:
■ मनाचा संघर्ष: आपण रोजच आपल्या मनाशी आणि इंद्रियांच्या वासनांशी झगडत असतो. श्रीकृष्णांनी इंद्रियांना आवरणे म्हणजे बाहेरील जगातून स्वतःला तोडणे नव्हे, तर ती ऊर्जा देवाकडे किंवा सकारात्मकतेकडे वळवणे आहे, हा विचार खूप दिलासादायक आहे.
अश्रू आणि वैराग्य हे अशक्तपणा नव्हे: आपण सहसा रडण्याला किंवा विरहाला अशक्तपणा मानतो. पण अर्जुनाच्या 'देवदत्त' शंखाच्या व्याख्येत स्पष्ट केले आहे की, ईश्वरासाठी किंवा ध्येयासाठी डोळ्यात येणारे अश्रू आणि अनुराग हीच खरी 'आध्यात्मिक संपत्ती' आहे.
प्रेमाचे बळ: सर्वात शेवटी, कोरड्या ज्ञानापेक्षा हृदयात निर्माण होणारी 'प्रीती' आणि 'भाव' (भीमाचा शंख) हाच सर्वात बलवान मानला गेला आहे. केवळ बुद्धीने नाही, तर भावनेनेच ईश्वर किंवा सत्य जिंकता येते.
गीता म्हणूनच केवळ एका विशिष्ट काळासाठी नव्हती, तर ती आजही आपल्या प्रत्येकाच्या आत चालणाऱ्या 'कुरुक्षेत्रावर' आपल्याला मार्गदर्शन करत राहते. म्हणूनच ही व्याख्या वाचताना मनाला एक वेगळीच शांतता आणि अनुभूती मिळते.
गीतेतच पुढे भगवंत याची पुष्टी करतात
क्रमश:....

# भारतीय कहावत कोषकार विश्वनाथ दिनकर नरवणे



विश्वास देशपांडे,
चाळीसगाव. 94037 49932



पुढे........
भारतातील विविध प्रांतात फिरताना त्या त्या भागातील शब्द, वाक्प्रचार त्यांनी गोळा केले. भारतातील कोणत्याही प्रांतात फिरताना कोणालाही अडचण येऊ नये म्हणून विविध भाषांतील समानार्थी वाक्ये त्यांनी एकत्र केली. त्यांच्या या सगळ्या प्रचंड खजिन्याचे रूपांतर भारतीय व्यवहार कोशात त्यांनी केले. विशेष म्हणजे देवनागरी लिपी ज्या कोणालाही वाचता येते, त्याला हा कोश वाचून कोणतीही भाषा शिकता येईल. कोठे काही अडणार नाही आणि देशातील बहुतेक सर्व प्रांतात सहजतेने वावरता येईल. तामिळ असो की तेलगू, बंगाली असो की आसामी... प्रत्येक भाषेतील शब्दाला त्यांनी देवनागरीचे सुंदर अस्तर लावले. जणू काही वेगवेगळ्या रंगांची फुले त्यांनी देवनागरीच्या एकाच सुवासिक धाग्यात ओवून भारताची एक सुंदर भाषिक माला तयार केली! विश्वनाथजींचा शिकण्याचा आणि काम करण्याचा आवाका प्रचंड होता. इंग्रजीसह सोळा भारतीय भाषा त्यांना अवगत होत्या.
ज्या भाषा त्यांना येत नव्हत्या, त्या शिकून घेण्यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. बडोद्यात शिक्षण घेतल्याने गुजराती भाषा त्यांना उत्तम येत होती. बंगाली शिकण्यासाठी गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांच्या शांतिनिकेतनात ते राहिले आणि बंगाली भाषा आत्मसात केली.
उर्दू शिकण्यासाठी लखनौ, हैदराबाद इ. ठिकाणी राहिले. काश्मीरी, पंजाबी, मल्याळम, कानडी या भाषादेखील अशाच प्रयत्नपूर्वक आत्मसात केल्या.
त्या काळी ते भाषेच्या संवर्धनासाठी घेत असलेल्या कष्टांची जाणीव फारच थोड्याना होती. सरकारकडून मदत मिळणे तर दूरचीच गोष्ट ! स्वतःच प्रांताप्रांतात फिरणे, मिळालेली माहिती लिहून ठेवणे, तिचे वर्गीकरण करणे, छापून आणण्यासाठी प्रयत्न करणे या सगळ्या गोष्टी कोणाच्याही मदतीशिवाय त्यांना एकट्यालाच कराव्या लागल्या. मिळेल त्या वाहनाने प्रवास करणे, मिळेल ते खाणे यासारख्या गोष्टी त्यांनी आनंदाने स्वीकारल्या. शिवाय त्याचे भांडवल केले नाही. हातामध्ये एक जुनी सॅक, डोळ्यांत एक अद्भूत स्वप्न आणि अंत:करणात भारताच्या विविध भाषांबद्दल अपार आदर घेऊन या माणसाने सतत एक तप देशाच्या कानाकोपऱ्यात पायपीट केली.
एका राज्याची सीमा ओलांडून दुसऱ्या राज्यात जाताना बदलणारी माती, तिथली संस्कृती आणि त्या संस्कृतीच्या कुशीत जन्मलेले 'शब्द' गोळा करण्याचा हा प्रवास एखाद्या महाकाव्यापेक्षा कमी नव्हता. क्रमश:.......

# नैसर्गिक पर्यावरणाच्या अवनतीस मानवच कारणीभूत

ज्योतिर्मय साहित्य

जागतिक पर्यावरण दिन २०२६ ची मुख्य संकल्पना हवामान कृती पृथ्वीच्या ढासळत्या वातावरणावर, तातडीने उचलल्या जाणाऱ्या पावलांवर लक्ष केंद्रित करणे. आज पर्यावरणाची व्याख्या मानवाला नेमकी कशी समजावून सांगावी? मानवाने नैसर्गिक परिस्थितीमध्ये स्वतः ला अनुकूल व फायदेशीर असे अनेक बदल घडवून आणून अनैसर्गिक पर्यावरणाची अशी निर्मिती केलेली आहे. मानवाने शहरे वसवून नैसर्गिक पर्यावरणात असंख्य बदल केलेले आहेत. पर्यावरण हे स्थिर नसून सतत बदलणारे असते. सजीव त्यांच्या अनुकूलनक्षमतेच्या साहाय्याने या बदलास सामोरे जात असतात. मात्र एका मर्यादेच्या (सहन शक्तीची कक्षा) आतमधील बदल सजीव सहन करू शकतात.... कारखाने, वीज निर्मिती केंद्रे, प्रदूषण निर्माण करणाऱ्या यांत्रिक मोटर्स यापासून तयार होणाऱ्या वायुच्या उत्सर्जनाने प्रदूषित झालेली आहे. म्हणूनच..... नैसर्गिक पर्यावरणाच्या अवनतीस मानवच विविध प्रकारे कारणीभूत आहे......कोणताही विकास करतांना पर्यावरण संतुलन राखणे हा जागतिक प्रश्न आहे. स्थानिक स्वराज्य संस्था लोकसहभागातून दररोज वृक्षारोपण चळवळ यशस्वी करीत आहेत.... पर्यावरण विषय अभ्यासक्रमात समाविष्ट केलाय. सोबतच...स्वच्छ भारत अभियान सुरु आहे.... चला... प्रत्येकांनी वाचवूया प्रत्येक थेंब पाण्याचा आणि प्रत्येक कण अन्नाचा.





मानवाने विविध रासायनिक विषांचा वापर करून रोगजंतू, किडी, तणे, कीटक इत्यादीचे केलेले आत्यंतिक नियंत्रण अण्णसाखळी विस्कळीत करून परिसंस्थेतील समतोल बिघडवीत आहे... किरणोत्सारी कचऱ्याचे पर्यावरणातील उत्सर्ग, नैसर्गिकरित्या न आढळणाऱ्या संयुगाची मानवाकडून होणारी निर्मिती, वाढणारे शहरीकरण, बेसुमार जंगलतोड, औद्योगिकीकरण यामुळे पर्यावरणाची अतोनात हानी होऊन प्रदूषणाची समस्यादेखील गंभीर बनत चालली आहे...

मानवी हस्तक्षेपांमुळे सजीवांच्या अनेक प्रजाती नामशेष झाल्या आहेत. एकंदरच पृथ्वीवरील जैवविविधतेस धोका निर्माण झाला आहे.

नैसर्गिक पर्यावरण अनेक परस्परसंबंधित घटकांनी युक्त असे संकीर्ण घटनादृश्य असून ते स्थल कालसापेक्ष गतिशील आहे. प्रत्येक सजीव आपली रचना, कार्य, पुनरुत्पादन, वाढ, विकास यामध्ये एकरूपता राखण्याचा प्रयत्न करून जनुकीय संवर्धन करीत असतो...

पृथ्वीवर पूर्णपणे नैसर्गिक असे कोणतेही पर्यावरण नाही. नैसर्गिकपणा सहसा एका सातत्यपूर्ण श्रेणीत असतो. नैसर्गिक पर्यावरणाच्या विरुद्ध मानवनिर्मित पर्यावरण असते. जिथे मानवाने भुदृश्यांमध्ये मूलभूत बदल घडवले आहेत, जसे की शहरी भाग आणि शेतजमिनीचे रूपांतरण. वारूळ बांधणाऱ्या वाळवीची कामे नैसर्गिक मानली जातात.. अँथ्रोप्रोसीन युगातील मानवाने केलेल्या प्रचंड पर्यावरणीय बदलामुळे सर्व नैसर्गिक पर्यावरणावर मूलभूत परिणाम झाला आहे. ज्यात जैवाविविधतेचा ऱ्हास, हवामान बदल, पाण्यातील मोठ्या प्रमाणातील प्लास्टिक आणि इतर रसायनमुळे होणारे प्रदूषण यांचा समावेश आहे. पर्यावरणातील विविध पैलुंचा विचार केल्यास त्यांच्या नैसर्गिकतेची पातळी एकसमान नाही हे सिद्ध होते. आपला पर्यावरणाकडे बघण्याचा दृष्टिकोन पवित्र... उदात्त... निरपेक्ष आणि विशाल असावा.





मानवी अस्तित्व आणि कल्याणासाठी नैसर्गिक पर्यावरण अत्यंत आवश्यक आहे. आपल्याला श्वास घेण्यासाठी शुद्ध हवा, पिण्यासाठी शुद्ध पाणी आणि अन्नाची निर्मिती पर्यावरणातूनच होते. वाढत्या औद्योगिकीकरण, अनिर्बंध वृक्षतोड आणि प्रदूषणांमुळे नैसर्गिक पर्यावरणाचा समतोल ढासळत आहे. यामुळे जागतिक तापमान वाढ (ग्लोबल वारमिंग) दुष्काळ, पूर आणि हवामानातील बदल यासारख्या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. पर्यावरण संवर्धनाबद्दल जागरूकता वाढविण्यासाठी दरवर्षी ५जून रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो.... मात्र मानवाने निसर्गाचा पोत सुरक्षित ठेवण्यासाठी प्लास्टिक वापर पूर्णतः बंद करणे महत्वाचे आहे.... निव्वळ एक दिवसाचा जागतिक पर्यावरण दिन साजरा करून काहीही बदलणार नाही. निसर्ग ऋतुचक्र बदलण्याची चेतावणी देत आहे.... निसर्ग वाचवा आणि आरोग्य सुरक्षित ठेवा...... चला तर प्रत्येकाची जबाबदारी म्हणून आपण पर्यावरणाचे रक्षण करूया.....

***

## श्याम बेनेगल पुस्तकावर शनिवारी चर्चासत्र आम्ही पुस्तकप्रेमी समूहातर्फे आयोजन

ज्योतिर्मय साहित्य




सातारा : येथील आम्ही पुस्तकप्रेमी समूह, दीपलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था व इतर साहित्य प्रेमींच्या पुढाकाराने डॉक्टर सविता मोहिते नायक यांनी लिहिलेल्या श्याम बेनेगल एक व्यक्ती एक दिग्दर्शक या पुस्तकावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार दिनांक ६ जून रोजी सायंकाळी साडेपाच वाजता दीपलक्ष्मी पतसंस्थेच्या हॉलमध्ये हा कार्यक्रम होणार आहे. या चर्चासत्राच्या अध्यक्षपदी साहित्य अकादमी पुरस्कार विजेते साहित्यिक व माजी संमेलन अध्यक्ष भारत सासणे उपस्थित राहणार असून या चर्चासत्रात ज्येष्ठ पत्रकार व प्रभातचे निवासी संपादक श्रीकांत कात्रे, हिंदी चित्रपटाचे अभ्यासक श्रीराम नानल, प्रख्यात लेखक व पर्यावरण तज्ञ डॉक्टर संदीप श्रोत्री प्रख्यात लेखिका सीमंतिनी नूलकर, प्रख्यात लेखक बाळासाहेब लबडे आणि स्वतः लेखिका डॉक्टर सविता नायक मोहिते सहभागी होणार आहेत. या चर्चासत्राला महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळाचे सदस्य विनोद कुलकर्णी यांची विशेष उपस्थिती असणार आहे. सर्वांनी या चर्चासत्राला उपस्थित राहावे असे आवाहन आम्ही पुस्तकप्रेमी समूहातर्फे डॉक्टर संदीप श्रोत्री, सातारा जिल्हा ग्रंथ महोत्सव समितीचे कार्यवाह शिरीष चिटणीस आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळाचे सदस्य विनोद कुलकर्णी यांनी केले आहे.

# आठवणींच्या भावगंधाने दरवळणारी 'चाफ्याची फुले'

ज्योतिर्मय साहित्य

'चाफ्याची फुले' हा विश्वजित जाधव यांचा पहिला काव्यसंग्रह मे २०२६ मध्ये साहित्यवेल प्रकाशन, सातारा यांनी प्रकाशित केला. तत्पूर्वी त्यांचा 'आठवणींच्या सावल्या' हा ललितलेख संग्रह २०२३ मध्ये साहित्यविश्व प्रकाशन, पुणे यानी प्रकाशित केला. या दोन्ही पुस्तकांबद्दल भाष्य करताना ज्येष्ठ कवयित्री नीलम माणगावे म्हणतात, ''आठवणींच्या सावल्यात चाफ्याची फुले हाती आली.'' (माणगावे : २०२६, ०४) अनेकार्थांनी ते खरेच आहे. लेखकाच्या आठवणींच्या सावल्यामधील गावाकडील माती आणि माणसांच्या आठवणी, शेत-शिवाराच्या आठवणी, पाऊस-पाण्याच्या आठवणी, शाळा-कॉलेजच्या आठवणी, साहित्याभ्यासाच्या आठवणी तसेच कौटुंबिक भावजीवनाच्या आठवणी या सगळ्या आठवणी चाफ्याची फुले या काव्यसंग्रहात काव्यरुपाने दरवळतात. आपल्या सात्विक अशा मंद-मोहक गंधाने रसिक मनाला मोहित करून गंधाळून सोडतात. प्रा. विश्वजीत जाधव यांच्या आठवणींच्या सावल्या या ललित लेखसंग्रहाला प्रस्तावना लिहिताना डॉ. यशवंत पाटणे लिहितात, ''लेखकाच्या मनात वसलेले गाव, गावाकडची कृष्णा नदी, गावातली माणसे, लळा लावणारा बहारदार निसर्ग, जिवाभावाने जपलेली नाती आणि भेटलेल्या मान्यवर व्यक्ती यांच्या भावरम्य आठवणींचे प्रसन्न प्रतिबिंब पुस्तकांमध्ये उमटलेले दिसते''. (पाटणे : २०२४, ४) या ललित लेख संग्रहातील अनेक आठवणी चाफ्याची फुले या काव्यसंग्रहात




शब्दरूपी काव्य फुलांनी दरवळत आहेत. त्यांचा हा दरवळ वाचकाच्या मनाला मोहून टाकणारा असा आहे हे श्रेय खचितच त्यांच्या कवितेचे आहे.

'चाफ्याची फुले' या ८८ पानी काव्यसंग्रहातील ७१ कवितांमधून कवी प्रा. विश्वजित जाधव यांनी आपला अवताल-भवताल त्याच्या रंग, रूप, रस, गंधासह साजिवंत केला आहे. ग्रामजीवन व ग्रामसंस्कृतीत रुजलेल्या या कवीने आपल्या जीवनाची नाळ इथल्या माती-माणसांशी, शेता-शिवारांशी, पाऊसा-पाण्याशी, नदी-नाल्यांशी आजही घट्ट जोडून ठेवलेली आहे. म्हणूनच त्यांची कविता ग्रामसंस्कृतीचा जिव्हाळा जपणारी खरी कविता आहे. माती अन माणसांचा जिव्हाळा जपणारा हा कवी मानवी जीवनातील नातेसंबधांना जीवापाड जपताना दिसतो. मानवी जीवनातील नात्यांमधील भावजीवनाची ओल जीवनाला खऱ्या अर्थाने समृद्धी प्राप्त करून देते याची प्रचिती ही कविता देते. नाती-गोती, बालपण, मैत्रभाव आणि कौटुंबिक भावजीवनात रमणारा हा कवी आपल्या आजीबद्दल, आजोबाबद्दल, आई, वडील, चुलते आणि भावंडाबद्दल, बालपणातील शालेय व कॉलेज जीवनातील मित्राबद्दल, शिक्षकांबद्दल पुढे जाऊन आपली पत्नी व स्नेह्यांसंबंधी आपल्या भावजीवनाबद्दल, शिक्षकी पेशातील आपल्या विद्यार्थाबद्दल भावसंपृक्त कविता लिहिताना दिसतो. या सर्वांबद्दल कवी मनात अपार जिव्हाळा आहे आणि या जिव्हाळ्यापोटीच हा काव्यसंग्रह कवीने आपल्या आजी आणि बापू व आई-वडिलांस अर्पण केला आहे.




आपल्या 'आजी' या कवितेत आजीचा कुटुंबाविषयीचा समर्पणभाव अतिशय कृतज्ञपणे व्यक्त करताना कवी आजीची रोजानं भांगलणारी आजी, धसकटं काशा वेचणारी आजी, घराचं घरपण जपणारी आजी, सर्वांची काळजी करणारी आजी, मृदू आजी, कणखर आजी, संसार-गाडा समर्थपणे पेलणारी आजी, पाच मुलं कमावती झाल्यावरही कष्ट करत जगणारी कष्टाळू आजी अशी अनेक रूपे कवितेतून व्यक्त करतो. तिच्या या विविध कष्टकरी रूपांनी भारावलेला कवी आपल्या आजीलाच प्रश्न विचारतो...

''आजी एवढं बळ तुला
येतं तरी कोठून?
पहाटे उठतेस, जात्यावर दळण दळतेस
झाड-लोट, सडा-सारवण करतेस
चुलीपुढे ठाण मांडून स्वयंपाक करतेस
गुर-ढोरं सांभाळतेस
शेत-शिवाराची आई होतेस'' (जाधव : २०२६, २३)

अशी आपली आजी ही केवळ आजी नसून ती संपूर्ण शेत-शिवाराची आई असल्याचे सांगताना कवीचा ऊर आजीविषयीच्या प्रेमाने व अभिमानाने भरून येतो. जशी कवितेत आजी येते तशी आई देखील येते एकत्र कुटुंबाच्या सुखी संसारासाठी समर्पणशील भावाने झिजणारी, पोटच्या पोरांना ज्ञानाची उजेड वाट देणारी, आपल्या उबदार पंखाची माया देणारी माय आणि ते बालपण फिरून येणार नसल्याची खंत कवीच्या मनाला लागून राहिलेली दिसते. कवी विश्वजित जाधवांच्या कवितेत जशी आजी येते, आई येते तसेच गवंडी काम करून आपले घर-दार सावरणारे आजोबा देखील त्यांच्या कवितेत अगदी सहजतेने येतात,

**(क्रमशः)**

## शब्दांची वेल बहरवणारे साहित्यिक श्री .दि.मा. देशमुख

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)



शब्दांमागचा अर्थ बघताना त्यांच्याच कवितेतून, त्यांच्या साहित्याचा गाभा समजून घ्यायचा तर त्यांच्याच ओळी पुरेशा आहेत.

- शब्दवेलीत त्यांनी ''शब्द रुजविले भावनेपोटी, शब्दवेल बहरली जीवनाप्रती''असा विश्वास मांडला.

तर भावधारेत ''कोसळल्या भावनेच्या धारा, वैविध्य विषयात रंगली चित्र नयनी असा अनुभव दिला आहे.

गंध मातीचा मधून ''मृग नक्षत्राचा पहिला पाऊस, घमघमाट सुटतो, लेखन हाच श्वास वाटतो''ही कृतज्ञता व्यक्त केली आहे तर हरिपाठ सारामृतातून हरिनाम हेच जीवनाचे सार, नामाविन व्यर्थ आहे सार'' हा अध्यात्म विचार दिला आहे.




मागे वळून पाहताना मध्ये ''जीवनाचे रहाटगाडगे, हाती येईल वळून पाहता धांडोळा मागे'' असे चिंतन मांडले आहे .

या लेखाचा शेवट करताना मी असे म्हणेल , शासकीय सेवेची चौकट ओलांडून शब्दांच्या मुक्त अवकाशात विहरणारे, मातीचा गंध आणि माणुसकीचा ओलावा कवितेतून जपणारे, आणि वयाच्या या टप्प्यावरही नव्या दमाने लिहिते राहणारे श्री.दि.मा. देशमुख सर हे नवोदितांसाठी एक चालते बोलते विद्यापीठ आहेत.

त्यांच्या शब्दयात्रेला, त्यांच्या उमद्या जगण्याला आणि त्यांच्या अखंड साहित्यसेवेला मानाचा मुजरा व पुढील लिखाण प्रवासाला खुप शुभेच्छा

# पर्यावरणाचे संवर्धन- सामूहिक जबाबदारी

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

जंगलांची होणारी कत्तल आणि अमर्याद प्रदूषणामुळे निसर्गाचा समतोल बिघडला आहे. जर आपण आताच ठोस कृती केली नाही, तर हवामान बदलाचे परिणाम पुढील पिढ्यांसाठी अत्यंत घातक ठरू शकतात.

संयुक्त राष्ट्रांनी १९७२ मध्ये स्टॉकहोम येथे झालेल्या मानव-पर्यावरण परिषदेमध्ये ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून घोषित केला. त्यानंतर ५ जून १९७३ रोजी जगभरात पहिला पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. तेव्हापासून दरवर्षी शंभराहून हून अधिक देश या मोहिमेत सहभागी होऊन पर्यावरण संवर्धनाचा संकल्प करतात.

दरवर्षी या दिवसासाठी संयुक्त राष्ट्रांकडून एक विशेष थीम,संकल्पना निश्चित केली जाते. या संकल्पनेच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाच्या विशिष्ट समस्येवर जागतिक पातळीवर लक्ष केंद्रित केले जाते. (उदा. मागील काही वर्षांत प्लॅस्टिक प्रदूषणाचा अंत करणे, प्लास्टिक वापरायला बंदी करणे यांसारख्या संकल्पनांवर भर देण्यात आला आहे).

यंदाच्या वर्षासाठी ''निसर्गाने प्रेरित. हवामानासाठी. आमच्या भविष्यासाठी'' ही विशेष संकल्पना जाहीर केली आहे.







यंदाची संकल्पना आपल्याला हेच शिकवते की, ज्या समस्या मानवाने निर्माण केल्या आहेत, त्यांचे उपाय निसर्गातच लपलेले आहेत. जंगलांचे पुनरुज्जीवन, नद्यांचे संवर्धन आणि जैवविविधतेचे रक्षण करून आपण कार्बन उत्सर्जनावर मात करू शकतो. तंत्रज्ञानाचा वापर करून शहरी वनीकरण ( ) वाढवणे आणि अपारंपरिक ऊर्जेचा (सौर व पवन ऊर्जा) वापर वाढवणे हाच यावरील सर्वोत्तम मार्ग आहे.

हा दिवस केवळ एक औपचारिकता नसून, आपल्या अस्तित्वाचा आधार असलेल्या पृथ्वीला वाचवण्यासाठी तातडीने पावले उचलण्याची आठवण करून देणारा धोक्याचा इशारा आहे.

**(क्रमशः)**

# पर्यावरणाच्या स्थिरतेसाठी जागा हो माणसा !

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)


मग, तारुण्याच्या शेवटीआयुष्याच्या तिस-या पर्वात आयुष्याच्या संध्याकाळी संपुर्ण आयुष्याचा अल्बम उघडून पाहताना त्यांच्याजवळ काहीच शिल्लक राहिलेलं नाही, हेच सर्व माणसांना अनुभवास येतं. कितीही कमाविली इस्टेट, धनसंपत्ती न मोजता येण्याइतकी तरीही, माणसांच्या खात्यात शून्यच शिल्लक राहते. हेच सत्य आहे.

चाळीस, पन्नास वर्षांपूर्वी माणसांजवळ जास्त पैसा, बँक बॅलन्स नसे. तेव्हा, बँकाही थोड्या होत्या. मुख्य म्हणजे बहुतांशी माणसांजवळ बँकेत ठेवण्या एवढा पैसाही नव्हता. संसाराचा सर्व व्यवहार, विश्वासावर व उधारीवर चालत असे. किराणा,कापड दूकानदार शिक्षक, सरकारी नोकरदार यांना विश्वासाने उधारीवर दूकानातील माल देत असत. तसेच, तेवढ्याच आत्मियतेने शिक्षक, सरकारी नोकरदार त्यांना पगार झाल्यावर उधारीची रक्कम परत करीत असत. सर्व धर्मांचे लोक त्यांचे सणवार सुध्दा जवळ पैसे असतो अथवा नसोत आनंदाने सणवार साजरे करीत असत. कारण, दूकानदार आणि ग्राहक यांचा एकमेकांवर विश्वास होता. कुणाचेही पैसे बुडवले तर देव शिक्षा करतो. खूप त्रास भोगावा लागतो, ही भावना होती. म्हणून, सर्वजण एकमेकांच्या सहकार्याने जीवन जगत असत. मग,ते कोणत्याही जाती धर्माचे का असेनात. हे सर्व विश्वासाच्या बळावर साध्य होत असे. पण, सध्याच्या काळात एकविसाव्या शतकात ही परिस्थिती पुर्णपणे एकदम बदललेली आहे. या

शतकातील तिसरे दशक सध्या सुरू आहे. कोणत्याही समाजाच्या कुटुंबातील माणसांचा


एकमेकांवर विश्वास राहिलेला नाही. तसेच, एकमेकांबद्दल आत्मियता, प्रेम राहिलेले नाही.

त्यामुळे, सर्व कुटुंबातील व समाजातील संतुलन बिघडत चालले आहे. हे कमी की काय म्हणून माणूस निसर्गाचेही संतुलन बिघडवत चालला आहे.



त्यामुळेच, निसर्गातील ऋतूंचे चक्रही बदलले गेले आहे. म्हणून, कोणत्याही ऋतूत पाऊस पडत आहे. याला कारण, दूष्ट प्रवृतीची माणसें आहेत. त्यामुळेच, ही परिस्थिती उदभवली आहे, पाच दशकांपूर्वी

त्या माणसांच्या पुण्याच्या खात्यात प्रेमाची, जिव्हाळ्याची, आनंदाची खूप बचत होत असे. आताच्या माणसांच्या पुण्याच्या खात्यात सुखाची, समाधानाची, प्रेमाची,आनंदाची बचत (फिक्स्ड डिपॉजिट) ही ''निरंक'' (निल) असते. हे बहूतांशी माणसांना आयुष्याच्या संध्याकाळी शेवटी, उशीरा लक्षात येते.पण, तेव्हा, वेळ निघून गेलेली असते. पण, दूस-यां माणसांच्या




अनुभवांवरुनही माणसे ही सध्याची माणसे ही गोष्ट शिकत नाहीत.फक्त, स्वार्थ साधण्यातच त्याचं सारं आयुष्य खर्च झालेलं असतं. त्यांच्या परिणामस्वरूप अशा माणसांना समाधान मिळत नाही. समाधान मिळण्यासाठी माणसांची कर्मे चांगली असावी लागतात.तरच, माणसांचं कौटुंबिक व सामाजिक संतुलन स्थिर राहतं. पण, वस्तुस्थिती अशी आहे की, दूष्कर्मे केल्याने माणसांचे काय हाल होतात. त्या दूष्कर्मांचे किती दु:खभोग अशा माणसांना भोगावे लागतात हे इतर माणसे पाहत असतात.तरिही, इतर माणसांतही स्वतःमध्ये चांगला बदल घडविण्याची प्रेरणा उत्पन्न होत नाही. असा बदल माणसांमाणसांत घडविण्यासाठी अनेक संतांना त्यांचं संपुर्ण आयुष्य खर्ची घालावं लागलं आहे. मुख्य मुद्दा हा आहे की, हे सर्व शतकानुशतके घडत आलेलं आहे. तरीही, प्रत्येक शतकातील माणसांत हे दूर्गुण जास्त प्रमाणात चिकटत चालले आहेत. द्वापारयुगात सुध्दा भरपूर क्रूर राक्षस होते. त्यात, प्रामुख्याने कंस हा महाक्रूर राक्षस होता. त्याचा वध करुन गोकुळ व मथुरावासियांना त्याच्या त्रासातून मुक्त करण्यासाठी भगवान श्रीकृष्णांनी मानवरुपात जन्म घेतला होता. त्यांनी कंसाला मारुन सा-यांची त्यांच्या छळातून मुक्तता केली. तसेच, शंभरासूर नावाचाही महाक्रूर राक्षस होता. तोही लोकांचा खूप छळ करीत असे. तेव्हा, माता रुक्मिणी भगवान श्रीकृष्णांना म्हणाली नाथ!आपण या महाक्रूर शंभरासूराला मारुन समस्त प्रजाजनांना त्यांच्या छळातून मुक्त का करीत नाही. तेव्हा, भगवान श्रीकृष्ण म्हणाले, देवी! त्यांचे शंभर अपराध झाल्यावर मी त्याला मारेनही,पण, पून्हा असे राक्षस जन्मणार नाहीत असं नाही. पण, पून्हा पून्हा मी त्यांना मारेन. भगवती, तुम्हाला एक सांगतो. कलियुगात तर या राक्षसांपेक्षाही दहा पटीने, पन्नास,शंभरपटीने महाक्रूर माणसे जन्मास येतील. ते सज्जन,गरीब लोकांवर खूप अत्याचार करतील मी योग्यवेळी पुन्हा अवतार घेवून त्या सर्व दूष्टांचा संहार करीन. भगवंतांनी सांगितल्याप्रमाणे आपण पाहतच आहात की, एकविसाव्या शतकात काही माणसे अत्यंत क्रूरतेने दूष्कृत्ये करीत आहेत. यावर, एकच मात्रा आहे. **(क्रमशः)**

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559